**महाराष्ट्र शासन**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय , महाराष्ट्र राज्य,**
**कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४**

☎ - 🖷- 022,27571391. E.Mail:- calfak6@yahoo.com

विषय:-१ कार्यालयीन आदेश क्रमांक ९०, दिनांक २८/७/२००६ मध्ये सुधारणा करणेबाबत.
२ कार्यालयीन आदेश क्रमांक ९, दिनांक २०/३/२००९.

30/7/2009

**कार्यालयीन आदेश क्रमांक** ३८ **दिनांक**

कार्यालयीन आदेश क्रमांक ९०, दिनांक २८/७/२००६ ला जोडलेल्या आक्षेपांच्या मसुद्यात परिच्छेद क्रमांक ७ ते ९ मध्ये तसेच संलग्न परिशिष्ठात दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

७) आक्षेपांचा मसुदा सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे राहील.
परिच्छेद क्रमांक १:- लेखापरीक्षणांस अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.

महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा) नियम १२ अन्वये ग्रामपंचायत पंचायत समिती जिल्हा चे वर्षे च्या लेखापरीक्षणास प्रारंभ करण्यापूर्वी लेखी नोटीस पत्र क्रमांक दिनांक अन्वये यांना (संबंधित व्यक्तीचे पदनाम) देण्यात आली. पूर्वसूचना देऊनही ग्रामपंचायतीचे अभिलेखें उपलब्ध न झाल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षा) नियम १९६१ मधील नियम १० अन्वये रितसर दुसरी नोटीस पत्र क्रमांक दिनांक अन्वये देण्यात आली. अभिलेखे सादर करण्याविषयी सूचना देण्यात आल्या. तथापि अभिलेखे उपलब्ध न झाल्याने ग्रामपंचायतीचे या वर्षाचे लेखापरीक्षण करता आले नाही. अभिलेखे सादर न करण्याच्या कारणाचे लेखी पत्र देण्यात आले आहे. यासह जोडलेल्या परिच्छेदात नमूद परिशिष्टात दर्शविलेली कारणे पहाता त्यावर पुढील कार्यवाही जिल्हा परिषदेकडून होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्षा नियम १९६१ मधील नियम १० नुसार लेखापरीक्षण प्रयोजनासाठी अभिलेखे उपलब्ध करून देणे संबंधित संस्थेचे कर्मचारी यांची जबाबदारी असतांना अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्याबाबत आक्षेप नोंदविण्यात येत असून सन ते या कालावधीत झालेला सर्व खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

८) उपरोक्त कालावधीचे अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या कालावधीचे लेखापरीक्षण होण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडे विशेष लेखापरीक्षणाचा स्वतंत्र प्रस्ताव पाठवावा. मंजूरीनंतर लेखापरीक्षण करण्यात येईल.

९) उपरोक्तप्रमाणे आक्षेप घेऊन लेखापरीक्षण अहवाल निर्गमित झाल्यानंतर त्यावर जिल्हा परिषदेने ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ४० (३) (क) प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

(माणिक कौरथी)
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा, संचालनालय
महाराष्ट्र राज्य.

# परिशिष्ट

## प्रलंबित घटकांच्या लेखापरीक्षणाबाबतची माहिती

| लेखापरीक्षण वर्ष | कार्यरत ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक | लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न केल्याची दिलेली कारणे |
|---|---|---|
| | | |

स्वाक्षरी

कनिष्ठ लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
----------